# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अतितात्काळ**

कालमर्यादेत दि. 29/10/2018

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/ST/2018/ 3569

दिनांकः- 26 OCT 2018

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची सखोल तपासणी करण्यासाठी गठीत केलेल्या विशेष तपासणी समितीस अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुरविण्याबाबत.

संदर्भ:- १. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे अ शा पत्र क्र. २अ/एडीएम/अ ज पडताळणी/ 2018/1365, दि. 25/10/2018

२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद याचे अ.शा.पत्र.क्र. 2018/वितस, दि. 20/10/2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची सखोल तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी समिती गठीत करण्यात आली आहे. संदर्भिय पत्रात नमुद केल्यानुसार सन 2008 ते 2018 पासून अनुसुचित जमातीच्या राखीव जागेवर आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील विवरणपत्रात ( **Excel Format मध्ये Hard & Soft Copy E-mail ronagpur@dtemaharashtra.gov.in** ) **दि. 29/10/2018 पर्यंत** सादर करावी. सदर माहिती विशेष तपासणी पथकास दयावयाची असल्याने माहितीस प्रथम प्राधान्य देण्यात यावी.

**Institute Name & Code:-**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | दावा केलेली जमात | अभ्यासक्र-माचे नांव | प्रवेश घेतलेल्या महाविद्याल-याचे नांव | प्रवेशाचे वर्ष | जमात प्रमाणपत्र निर्गमित केलेले सक्षम प्राधिकारी कार्यालय, प्रमाणपत्र क्र. | वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या समितीचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

सहपत्र:- संदर्भिय पत्र

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स : 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे आणि कालमर्यादित

क्रमांक: २अ/एडीएम/ अ ज पडताळणी/२०१८/ 9३६4

दिनांक : 25 OCT 2018

प्रति,

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जातप्रमाणपत्रे पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इ.सखोल तपासणी करणेसाठी गठित केलेल्या विशेष तपासणी समितीस अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुरविणेबाबत...

संदर्भ : विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग यांचे अ.शा.पत्र क्रमांक २०१८/मावक/वितस, दिनांक २०.१०.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, औरंगाबाद विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक १.७.२०१६ अन्वये शासनाने विशेष तपासणी समिती गठित केली आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव जागेवर सन २००८ ते २०१८ पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात सादर करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये संचालनालयास कळविण्यात आले आहे.

समितीस दिनांक ३१.१०.२०१८ पूर्वी शासनास अहवाल सादर करावयाचा असल्याने आपल्या अधिनस्त असलेल्या विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव जागेवर सन २००८ ते २०१८ पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती व अभिलेखे (जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरून दिनांक २७.१०.२०१८ पर्यंत संचालनालयास सादर करावेत. तसेच त्याची एक प्रत अनुक्रमे मा. विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद ४३१००१ आणि मा.आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे २८,क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ,बंडगार्डन रोड, पुणे ४११००१ यांच्या कार्यालयास सादर करण्यात यावी.

( डॉ.अभय वाघ )

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा. विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद ४३१००१ आणि मा.आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांना माहितीस्तव सादर

अ.शा.पत्र.क्र. २०१८/मावक/वितस/
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग
औरंगाबाद – ४३१ ००१
☎ : ०२४०–२३३१२९४ / २३५००४४ (का)
२३३०९०२ (फॅक्स) २३३१२२१ (नि)
E-mail : divcom.aurangabad@maharashtra.gov.in
divcomabd@gmail.com

डॉ. पुरुषोत्तम भापकर
भा.प्र.से.
विभागीय आयुक्त

दिनांक : २०-ऑक्टोबर, २०१८

विषय:- औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेवून अनु.जमातीची बोगस जातप्रमाणपत्रे पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे ई. सखोल तपासणी करणेसाठी गठीत केलेल्या विशेष तपासणी समितीस अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुरविणे बाबत.

प्रिय डॉ वाघ साहेब,

औरंगाबाद विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 1.07.2016 अन्वये शासनाने विशेष तपासणी समिती गठीत केली आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव जागेवर सन 2008 ते 2018 पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात सादर करण्या बाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी त्यांचे पत्र दि.15.10.2018 अन्वये आपणास कळविलेले आहे.

समितीस दिनांक 31.10.2018 पूर्वी शासनास अहवाल सादर करावयाचा आहे ही बाब लक्षात घेऊन विविध अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सन 2008 ते 2018 पर्यंत अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती व अभिलेखे (जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र) सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन दिनांक 26.10.2018 पूर्वी या कार्यालयास व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना देणेस विनंती आहे.

तिलेट

आपला
[signature] 20/10/2018
(डॉ.पुरुषोत्तम भापकर)

प्रति,
डॉ.अभय वाघ
संचालक,
तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य,
3, महानगरपालिका मार्ग,पो.बॉ.क्र.1967
मेट्रो सिनेमा समोर, मुंबई 400 001.

D-2/2A

९८४३३
२३/१०/१८

Scanned by CamScanner

## विवरणपत्र

**अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सन 2008 ते 2018 पावेतो पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती.**

| | विद्यार्थ्याचे नाव | दावा केलेली जमात | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे नाव | प्रवेशाचे वर्ष | जमात प्रमाणपत्र निर्गमीत केलेले सक्षम प्राधिकारी कार्यालय, प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक | वैधता प्रमाणपत्र क्रमांक, दिनांक | प्रमाणपत्र निर्गमीत केलेल्या समितीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

Scanned by CamScanner